# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७ / (३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालीत राज्य विद्यापीठ)

## क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग

एम.आय.डि.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली - ४४२६०५


जावक क्र./गों.वि.ग./क्री.शा.शि./ १४५ /२०२६ दिनांक : ०४/०८/२०२६

### परिपत्रक

**विषय : भारतीय विद्यापीठ संघ (AIU) यांचेकडून सुरू करण्यात आलेल्या नवीन AIU Sports Portal व Athlete Registration System वर खेळाडू नोंदणी करण्याबाबत.**

**संदर्भ :** भारतीय विद्यापीठ संघ , नवी दिल्ली यांचे पत्र क्र. **AIU/Sports Portal/2026, दिनांक 31 जुलै 2026.**

उपरोक्त विषय व संदर्भीय पत्रान्वये सर्व संबंधितांच्या माहितीसाठी कळविण्यात येते की, भारतीय विद्यापीठ संघ (AIU) यांनी आंतरविद्यापीठीय क्रीडा स्पर्धांशी संबंधित विविध प्रक्रिया सुलभ, डिजिटल व ऑनलाइन पद्धतीने राबविण्यासाठी नवीन **AIU Sports Portal** तसेच **Athlete Registration System** सुरू केले आहे.

या अनुषंगाने AIU क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या **सर्व संबंधित खेळाडू, प्रशिक्षक, क्रीडा शिक्षक/शारीरिक शिक्षण संचालक, क्रीडा प्रभारी व इतर संबंधितांनी** खालील बाबींची नोंद घ्यावी.

**1. AIU Sports Portal**

AIU क्रीडा स्पर्धांशी संबंधित विविध प्रक्रिया यापुढे ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येणार आहेत. यामध्ये प्रामुख्याने पुढील बाबींचा समावेश आहे :-

1. AIU क्रीडा स्पर्धांच्या आयोजनासाठी प्रस्ताव सादर करणे.
2. AIU क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागासाठी **General Entries व Detailed Entries** सादर करणे.
3. आगामी आंतरविद्यापीठीय क्रीडा स्पर्धांबाबतची माहिती व संबंधित पत्रव्यवहार प्राप्त करणे.
4. यापूर्वी ऑफलाइन पद्धतीने राबविण्यात येणाऱ्या इतर क्रीडा-संबंधित प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबविणे.

**2. Athlete Registration System अंतर्गत खेळाडू नोंदणी**

AIU यांनी AIU Sports Portal अंतर्गत स्वतंत्र **Athlete Registration Module** सुरू केले असून, AIU क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सर्व खेळाडूंनी या प्रणालीवर स्वतःची नोंदणी करणे आवश्यक आहे.

खेळाडूंनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी :-

1. AIU Portal वर संबंधित खेळासाठी स्वतःची **ऑनलाइन खेळाडू नोंदणी** करावी.
2. प्रत्येक खेळाडूसाठी नोंदणी शुल्क **₹100/- अधिक लागू GST (सध्या** 18%) देय राहील.
3. नोंदणी प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण झाल्यानंतर संबंधित खेळाडूस एक **विशिष्ट AIU Sports ID** प्रदान करण्यात येईल.
4. सदर **AIU Sports ID** भविष्यातील सर्व क्रीडा-संबंधित प्रक्रियांसाठी वापरण्यात येणार आहे.
5. संबंधित खेळाडूने एखाद्या विशिष्ट खेळासाठी नोंदणी केल्यानंतर त्याची नोंदणी विनंती संबंधित विद्यापीठाच्या **क्रीडा संचालक** यांच्याकडे पडताळणी व मंजुरीसाठी पाठविण्यात येईल.
6. संबंधित क्रीडा संचालक यांच्याकडून नोंदणी विनंतीचे परीक्षण व मंजुरी झाल्यानंतरच खेळाडूची नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाल्याचे ग्राह्य धरले जाईल.
7. AIU क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या संघाची निवड ही **यशस्वीरीत्या नोंदणी झालेल्या व मंजूर खेळाडूंच्या समूहातून** करण्यात येईल.

3. **महत्त्वाची सूचना**

AIU Portal वर खेळाडूची नोंदणी यशस्वीरीत्या झाल्याने संबंधित खेळाडूची विद्यापीठाच्या क्रीडा संघात निवड होईलच, असे नाही.

विद्यापीठाच्या क्रीडा संघातील खेळाडूंची अंतिम निवड ही संबंधित विद्यापीठाच्या **अंतर्गत निवड प्रक्रिया, खेळाडूची कामगिरी, निर्धारित कामगिरीचे निकष, पात्रता निकष तसेच लागू असलेल्या इतर नियम व अटींनुसार** करण्यात येईल.

त्यामुळे AIU Portal वरील नोंदणी ही **क्रीडा स्पर्धेत सहभागासाठी आवश्यक असलेली नोंदणी प्रक्रिया** असून, ती विद्यापीठाच्या संघातील अंतिम निवडीची हमी समजण्यात येऊ नये.

4. **सर्व संबंधितांसाठी आवाहन**

AIU क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सर्व खेळाडूंनी **https://sports.aiu.ac.in** या AIU Sports Portal वर आपली नोंदणी विहित पद्धतीने व वेळेत पूर्ण करावी. तसेच विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांतील प्राचार्य, क्रीडा संचालक/शारीरिक शिक्षण संचालक, क्रीडा शिक्षक, प्रशिक्षक व संबंधित खेळाडूंनी सदर माहिती आपल्या स्तरावर सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावी.

AIU Sports Portal वरील Login, Athlete Registration, General Entries, Detailed Entries, प्रस्ताव सादरीकरण किंवा इतर कोणत्याही तांत्रिक बाबींसंदर्भात काही अडचण, शंका किंवा स्पष्टीकरण आवश्यक असल्यास भारतीय विद्यापीठ संघाच्या क्रीडा विभागाशी संपर्क साधावा.

**AIU Sports Portal Link : https://sports.aiu.ac.in**

संपर्क व्यक्ती : श्री. गौरव यादव
क्रीडा विभाग, भारतीय विद्यापीठ संघ (AIU)
ई-मेल : aiusportsportal@gmail.com

सदर परिपत्रकाची माहिती सर्व संबंधित खेळाडू, प्रशिक्षक, क्रीडा शिक्षक/शारीरिक शिक्षण संचालक व इतर संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी व आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. ही बाब अत्यंत महत्त्वाची व तातडीची समजून कार्यवाही करावी.

**डॉ. अनिता लोखंडे**
संचालक, क्रीडा व शा. शिक्षण विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी माहितीस्तव व कार्यवाहीस्तव सादर -**

1) मा. कुलगुरु महोदय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
2) मा. प्र-कुलगुरू महोदय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
3) मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
4) मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
5) संचालक, क्रीडा व शा. शिक्षण, सर्व संलग्नीत महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली